# सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत शुश्रृषा संवर्गातील गट-क सरळसेवेच्या पदभरतीच्या जाहीर प्रकटनबाबत

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत उपसंचालक आरोग्य सेवा (शुश्रृषा) मुंबई यांच्या राज्यस्तरीय आस्थापनेवरील शुश्रृषा संवर्गातील पाठयनिर्देशिका या संवर्गाची रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत दिनांक २८.०२.२०२१ रोजी घेण्यात आलेल्या परिक्षेच्या अनुषंगाने वेळोवेळी सुचना/जाहिर प्रकटने आयुक्तालयाच्या https://arogya.maharashtra.gov.in/ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर पदभरतीच्या अनुषंगाने समुपदेशनास गैरहजर असलेले, अपात्र ठरलेले व नियुक्ती आदेश देऊनही रुजु न झालेल्या उमेदवारांऐवजी गुणवत्तेनुसार पुढील उमेदवारांची तात्पुरती/अंतरीम प्रतिक्षा यादी (Provisional) आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर दि.२३.१.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर तात्पुरती/अंतरीम (Provisional) प्रतिक्षा यादीवर काही आक्षेप/हरकत असल्यास सदर यादी प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून तीन (३) दिवसांत सबळ पुराव्यासह हरकत विहीत वेळेत कार्यालयास पोच होईल याची दक्षता उमेदवारांनी घ्यावी, असे कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार आयुक्तालयास प्राप्त आक्षेप/हरकतींचे निवारण करण्यात आलेले आहे. प्राप्त आक्षेपानुसार श्री. संदिप बाबुराव राजमाने यांची निवड अजा-खेळाडु या प्रवर्गातून केलेली होती. परंतु त्यांचे प्रमाणपत्र पडताळणी अहवालाबाबत ते विहीत शासन निर्णयानुसार प्रमाणीत केलेले नसल्याने त्यांची निवड रद्द करण्यात आलेली होती व अंतरीम/तात्पुरती प्रतिक्षा यादीमध्ये गुणवत्तेनुसार पुढील उमेदवाराची निवड करण्यात आलेली होती.

तथापि श्री. राजमाने यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण, मुंबई येथे मुळ अर्ज क्र. १०८/२०२४ दाखल केलेला असल्याने मा. न्यायालयाच्या Oral Order नुसार सदर पद पुढील आदेशाच्या अनुषंगाने रिक्त ठेवण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने सदर पद रिक्त ठेवण्यात येऊन अंतिम निवड यादी आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच सदर उमेदवारांचे समुपदेशन **दि.०६.०२.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता तळमजला, आरोग्य सेवा आयुक्तालय, आरोग्य भवन, मुंबई येथे** आयोजित करण्यात येत आहे.

विशेष सुचना - आयुक्तालयाने यापुर्वी प्रसिध्द केलेल्या व आवश्यक असलेल्या जाहिर प्रकटनाच्या सुचना सोबत जोडण्यात येत आहेत. तसेच उमेदवारांकरीता आवश्यक कागदपत्राचा तपशिल तसेच सुचना सोबत जोडण्यात येत आहे. सदर सुचनांचे उमेदवारांनी व्यवस्थित अवलोकन करुन समुपदेशान दिवशी उपस्थित रहावे.

दि. ०२.०२.२०२४
ठिकाण - मुंबई

स्वाक्षरी/-

उपसंचालक, (शुश्रृषा)

आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबई

# सरळसेवेच्या पाठयनिर्देशिका संवर्गाकरिता अंतिम प्रतिक्षा यादी

| अ.क्र. | प्रवर्ग | गुणवत्ता यादीतील गुणवत्ता क्रमांक | बैठक क्रमांक | नाव | शैक्षणिक अर्हता | प्रवर्गनिहाय निवड | गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | OPEN | 26 | 4642120128 | SHAMUVEL VILAS SREESUNDAR | GRADUATE | Open- General | 146 |
| 2 | OPEN | 94 | 4622120185 | RUKSAR MAHAMMADHANIF PATEL | GRADUATE | open (Female) | 136 |
| 3 | OPEN | 102 | 4642120404 | SANJOGATA SAMBHAJIRAO SURYAVANSHI | GRADUATE | open (Female) | 134 |
| 4 | OPEN | 104 | 4642120502 | JYOTI MAHALINGAPPA MOPAGAR | GRADUATE | open (Female) | 134 |
| 5 | OPEN | 108 | 4642120029 | POOJA SUNDAR KAKADE | GRADUATE | open (Female) | 134 |
| 6 | NT-D | 28 | 4642120022 | AJAY GANGADHAR DHAKNE | GRADUATE | open(Ex Service Man ) against | 146 |
| 7 | OPEN | 39 | 5602120275 | KAVITA ANAND DESAI | GRADUATE | open(Ex Service Man ) against | 142 |
| 8 | OPEN | 45 | 4792120644 | SUPRIYA SHIRDHAR PATKAR | DIPLOMA | open(Ex Service Man ) against | 140 |
| 9 | OPEN | 52 | 4792120220 | CHAITANYA GANGADHAR JOSHI | GRADUATE | open(Ex Service Man ) against | 140 |
| 10 | OPEN | 57 | 4792120555 | AMAR ALIM MULLA | DIPLOMA | open(Ex Service Man ) against | 138 |
| 11 | OPEN | 59 | 4642120314 | PRADIP VISHNU CHOUGALE | GRADUATE | open(Ex Service Man ) against | 138 |
| 12 | OPEN | 60 | 4642120141 | SHARADCHANDRA VINAYAK DIGHE | POST-GRADUATION | open(Ex Service Man ) against | 138 |
| 13 | OPEN | 61 | 6172120039 | VIJAY DHANAJI JADHAV | GRADUATE | open(Ex Service Man ) against | 138 |
| 14 | OPEN | 62 | 4622120030 | VIDULA VIKAS KOTHAMKAR | POST-GRADUATION | open(Ex Service Man ) against | 138 |
| 15 | OPEN | 655 | 4622120324 | RAOSAHEB BABAN JAGTAP | POST-GRADUATION | open(SportMan ) | 110 |

Pawar

अधिक्षक

उपसंचालक,आरोग्य (शुश्रृषा),मुंबई

Nilima 2/2/2024

सहायक संचालक ( शुश्रृषा)

आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई

2/2/24

मुख्य प्रशासकिय अधिकारी

आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई

02/02/2024

उपसंचालक,आरोग्य (शुश्रृषा)

आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई

02/02/24

सहसंचालक,आरोग्य (अवैप)

आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई

# सरळसेवेच्या पाठयनिर्देशिका संवर्गाकरिता अंतिम प्रतिक्षा यादी

| अ.क्र. | प्रवर्ग | गुणवत्ता यादीतील गुणवत्ता क्रमांक | बैठक क्रमांक | नाव | शैक्षणिक अर्हता | प्रवर्गनिहाय निवड | गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 16 | OPEN | 661 | 4642120188 | SONALI ARUN BHONDVE | POST-GRADUATION | open(SportMan ) | 110 |
| 17 | OPEN | 530 | 6172120214 | SHAM FULCHAND MALI | GRADUATE | Open (Project Affacted) | 114 |
| 18 | OPEN | 63 | 1952120009 | JOHNSON SIMON RAO | GRADUATE | Open (part Time) against | 138 |
| 19 | OPEN | 65 | 4792120343 | VINIT PREMDAS DHUNDALE | POST-GRADUATION | Open (part Time) against | 138 |
| 20 | SC | 105 | 4642120239 | ASHITKUMAR MAHALING TARKASE | GRADUATE | SC-Genral | 134 |
| 21 | SC | 110 | 6172120339 | SAFAL NIRANJAN FULZELE | GRADUATE | SC (Ex Service Man ) against | 134 |
| 22 | SC | 112 | 4642120182 | MANOJ RAMESHRAO GAWANDE | GRADUATE | SC (Ex Service Man ) against | 134 |
| 23 | SC | 113 | 4792120288 | GAURAV RAMCHANDRA SAKATE | GRADUATE | SC (Ex Service Man ) against | 134 |
| 24 | ST | 634 | 4642120455 | CHHAYA SUBHASH GAVIT | GRADUATE | ST (Female) | 110 |
| 25 | ST | 720 | 6172120263 | MEGHA ASHOK HOLGIRE | GRADUATE | ST (Female) | 108 |
| 26 | ST | 695 | 1952120116 | ANKUSH BABARAO RAJGADKAR | GRADUATE | ST (Ex Service Man ) against | 108 |
| 27 | ST | 947 | 6172120038 | NEHA MADHUKAR MAHAJAN | GRADUATE | ST (Ex Service Man ) against | 100 |
| 28 | VJ-A | 72 | 4622120265 | SUSHILKUMAR BHARATRAO JADHAV | GRADUATE | VJ A -Genral | 138 |
| 29 | VJ-A | 293 | 4642120187 | PRARTHANA ARUNRAO MANE | GRADUATE | VJ A (Female) | 124 |
| 30 | VJ-A | 106 | 6172120001 | RAHUL SHANKARRAO PAWAR | GRADUATE | VJ A(Ex Service Man ) against | 134 |

Pawar

अधिक्षक

उपसंचालक,आरोग्य (शुश्रृषा),मुंबई

Nilima 2/2/24

सहायक संचालक ( शुश्रृषा)

आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई

2/2/24

मुख्य प्रशासकिय अधिकारी

आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई

उपसंचालक,आरोग्य (शुश्रृषा)

आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई

सहसंचालक,आरोग्य (अवप्र) 02/02/24

आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई

# सरळसेवेच्या पाठयनिर्देशिका संवर्गाकरिता अंतिम प्रतिक्षा यादी

| अ.क्र. | प्रवर्ग | गुणवत्ता यादीतील गुणवत्ता क्रमांक | बैठक क्रमांक | नाव | शैक्षणिक अर्हता | प्रवर्गनिहाय निवड | गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 31 | NT-B | 211 | 4622120229 | AKSHAY SURESH DAHALE | GRADUATE | NT B-Genral | 128 |
| 32 | NT-C | 202 | 1952120125 | CHAYA VASANT BIRAJDAR | GRADUATE | NT C (Female) | 128 |
| 33 | NT-C | 238 | 4642120150 | EKNATH BANSIDHAR BANSODE | GRADUATE | NT C(Ex Service Man ) against | 126 |
| 34 | OBC | 115 | 4792120424 | RAMPRASAD GAJANAN TATHE | GRADUATE | OBC-Genral | 134 |
| 35 | OBC | 122 | 4642120456 | ASMITA SUJIT LAHANE | GRADUATE | OBC-Genral | 132 |
| 36 | OBC | 143 | 6172120284 | BHAGYASHRI DINESH INGLE | GRADUATE | OBC (Female) | 132 |
| 37 | OBC | 133 | 4622120349 | KRISHNA BABURAO SHINDE | GRADUATE | OBC (Ex Service Man ) against | 132 |
| 38 | OBC | 141 | 6172120053 | UDDHAV MAROTRAO HINGMIRE | GRADUATE | OBC (Ex Service Man ) against | 132 |
| 39 | OBC | 144 | 6172120159 | MAKRAND CHANDRAKANT PATIL | GRADUATE | OBC (Ex Service Man ) against | 132 |
| 40 | OBC | 145 | 4622120323 | RUPALI KASHINATH PARSHARAM | GRADUATE | OBC (Ex Service Man ) against | 132 |
| 41 | OBC | 146 | 4792120507 | ANJALI ASHOKRAO MATHAPATI | GRADUATE | OBC (project affected) against | 132 |
| 42 | OBC | 147 | 4792120495 | SAMAVIDYA MAHADEV BANDRE | GRADUATE | OBC (part Time) against | 132 |
| 43 | EWS | 722 | 4622120122 | PRAVIN BHAUSAHEB MUSMADE | GRADUATE | EWS -Genral | 108 |
| 44 | EWS | 765 | 4622120174 | MANISHA DILIP BARDE | GRADUATE | EWS -Genral | 106 |
| 45 | EWS | 774 | 6172120076 | RAJENDRA RAMESH SHINDE | GRADUATE | EWS (Ex Service Man ) against | 106 |
| 46 | EWS | 810 | 4642120158 | MEGHA GORAKHNATH CHAVAN | GRADUATE | EWS (Ex Service Man ) against | 104 |

2/2/2024

अधिक्षक
उपसंचालक,आरोग्य (शुश्रृषा),मुंबई

सहायक संचालक ( शुश्रृषा)
आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई

2/2/24.
मुख्य प्रशासकिय अधिकारी
आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई

उपसंचालक,आरोग्य (शुश्रृषा)
आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई

02/02/24
सहसंचालक,आरोग्य (अवप्र)
आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई

# सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत शुश्रृषा संवर्गातील गट-क सरळसेवेच्या पदभरतीच्या जाहीर प्रकटनबाबत

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत उपसंचालक आरोग्य सेवा (शुश्रृषा) मुंबई यांच्या राज्यस्तरीय आस्थापनेवरील शुश्रृषा संवर्गातील पाठयनिर्देशिका या संवर्गाची रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत दिनांक २८.०२.२०२१ रोजी घेण्यात आलेल्या परिक्षेबाबत मा.संचालक आरोग्य सेवा पुणे व मे. जिंजर प्रा. लि. यांच्याकडून दि.१२.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सोबत प्राप्त झालेली गुणवत्ता यादी मा.आयुक्त महोदय आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबई यांच्या मान्यतेने आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर दि.२१.१०.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती.

**परंतु उमेदवारांनी घेतलेल्या आक्षेपानंतर मा.आयुक्त महोदय आरोग्य सेवा मुंबई यांच्या मान्यतेने सुधारित गुणवत्ता यादी व सदरच्या सुधारीत यादीवरुन तयार करण्यात आलेली निवड पात्र उमेदवारांची यादी आयुक्तालयाच्या https://arogya.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.**

- सदरची निवड यादी ही उमेदवारांनी भरलेल्या आवेनदनापत्रामधील ( Application form ) माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेली आहे.
- पदासाठींच्या पात्रतेची तपासणी, प्रमाणपत्राची वैधता व अर्जातील दावे यांची वैधता तपासणीनंतरच नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.
- सोबत जोडलेल्या परिशिष्ट क मधील समुपदेशन प्रक्रियेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच परिशिष्ट ब मध्ये नमुद असलेले परिशिष्ट प्रमाणपत्र / कागदपत्रे यांची मुळ प्रमाणपत्रे यांची मुळ प्रमाणपत्रे आणि साक्षांकित केलेली एक प्रत तसेच मुळ प्रवेशपत्र व परिक्षेसाठी फॉर्म ( अर्ज) भरणेत आलेची प्रत सोबत असणे आवश्यक आहे.
- समुपदेशनाचे वेळी उमेदवारांची सर्व मुळ कागदपत्रे व शैक्षणिक अर्हता व तत्ससंबंधी अर्हतेबाबत दस्ताऐवज तपासूनच पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल.त्यामुळे केवळ समुपदेशनाला पाचारण केल्यामुळे नियुक्तीचा हक्क प्राप्त होणार नाही याची नोंद घ्यावी.
- निवड झालेल्या उमेदवारांचे समुपदेशन दि.१६.११.२०२२ रोजी सकाळी ९.३० वाजता आरोग्य सेवा आयुक्तालय, आरोग्य भवन मुंबई येथे आयोजित केलेले आहे.तरी निवड पात्र उमेदवारांनी समुपदेशनास उपस्थित राहावे. याची सर्व निवड पात्र उमेदवारांनी नोंद घ्यावी.

दि.११.११.२०२२

ठिकाण - मुंबई

---

**विषय - पाठयनिर्देशिका या पदाची सुधारित गुणवत्ता यादी व निवड यादी शुध्दीपत्रक**

उपरोक्त विषयान्वये, गट-क संवर्गातील सरळसेवा भरतीप्रकिया पाठयनिर्देशिका या पदावर गुणवत्ताधारक उमेदवारांना नियुक्ती देणेबाबत जाहिर प्रगटन व निवड यादी दि.११.११.२०२२ रोजी आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती.

सदर प्रसिध्द करण्यात जाहिर प्रगटनामधील परिशिष्ट ब मधील मुद्दा क्र. १३ मध्ये खालील प्रमाणे सुधारण करण्यात येत आहे.

"जाहिरात प्रसिध्द झालेल्या दि. ०८.०३.२०१९ रोजी पाठयनिर्देशिक पदावर १ वर्षाचा अनुभव प्रमाणपत्र" ऐवजी "Provided that candidates possessing B.sc. Degree in Nursing recognised by the Indian Nursing Council shall be eligible if they possess experience for not less than one year after graduation and are registered by the Maharashtra Nursing Council or are eligible for such registration "असे वाचावे.

स्वाक्षरी/-
उपसंचालक ( शुश्रृषा )आरोग्य सेवा मुंबई

दिनांक - १४.११.२०२२
ठिकाण - मुंबई

# परिशिष्ट "ब"

आरोग्य सेवा आयुक्तालय

उपसंचालक आरोग्य सेवा (शुश्रृषा), मुंबई

पदाचे नाव - पाठयनिर्देशिका

उमेदवाराचे नाव - ........................................................................................

बैठक क्रमांक-..............................

| अ.क्र. | कागदपत्राचा तपशील | सादरकेलेले प्रमाणपत्र | मान्य/ अमान्य | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | जन्म तारखेचे प्रमाणपत्र (जन्म प्रमाणपत्र किंवाशाळा सोडल्याचा दाखला/ शालांत परीक्षा प्रमाणपत्र) | | | |
| २ | जात प्रमाणपत्र (जातीचा तपशिल) (प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक) | | | |
| ३ | जात वैधता प्रमाणपत्र (प्राधिका-याचे पदनाम व ठिकाण) ( प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक) | | | |
| ४ | जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे उन्नत व प्रगत गठात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र (प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक) | | | |
| ५ | अधिवास प्रमाणपत्र (प्रधिका-याचे पदनाम व ठिकाण) | | | |
| ६ | दि. ०८.०३.२०१९ रोजी प्रसिध्द केलेल्या शुध्दीपत्रकामध्ये नमुद केल्याप्रमाणे शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे/ माध्यमिक व उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्रे/ किंवा तत्सक परिक्षामराठी व हिंदी भाषेसह उत्तीर्ण केलेली असावी. | | | |
| ७ | मान्यता प्राप्त संस्थेचे संगणक अर्हता प्रमाणपत्र | | | |
| ८ | उमेदवाराचे बारावीचे इंग्रजी विषयाचे एकुण गुण आणि उमेदवाराचे I have adequate knowledge of English असे हमीपत्र | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | अशंकालीन/प्रकल्पग्रस्त/ खेळाडु/माजी सैनिक/अपंग या पैकी असल्यास जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे संबंधित सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र(निवड झालेल्या अशंकालीन कर्मचा-यांचे अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र) (प्रकल्पग्रस्त व भुंकपग्रस्त उमेदवारांसाठी जिल्हाधिकारी / जिल्हापुनर्वसन अधिकारी यांचे स्वाक्षरी व नानिर्देशित केलेले प्रमापणपत्र) (खेळाडु प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्यस्तरावरील खेळांचे व प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-यांचे असावे) (माजी सैनिक उमेदवारासाठी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची प्रत व डिस्चार्ज बुक) | | | |
| १० | उमेदवाराने दावा केल्यानुसार त्या आरक्षित पदाचे आवश्यक कागदपत्रे | | | |
| ११ | महाराष्ट्र परिचर्या परिषदेचे नोंदणी व नुतनीकरण केल्याचा पुरावा | | | |
| १२ | बीएसस्सी नर्सिंग / एमएसस्सी नर्सिंग यांचे पुर्ननोंदणी केल्याचा पुरावा | | | |
| १३ | जाहिरात प्रसिध्द झालेल्या दि. ०८.०३.२०१९ रोजी पाठयनिर्देशिक पदावर १ वर्षाचा अनुभव प्रमाणपत्र | | | |
| १४ | इंग्रजी भाषेचे ज्ञान असल्याचे प्रमाणपत्र | | | |
| १५ | लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र | | | |
| १६ | अर्जात नमुद केलेल्या पत्त्यावर रहात असल्याबाबतचा पुरावा | | | |
| १७ | स्वतःचे फोटो असलेले ओळख पत्र | | | |
| १८ | स्वतःचा पासपोर्ट साईज दोन फोटो | | | |
| १९ | आधारकार्ड | | | |
| २० | पॅनकार्ड | | | |
| २१ | विवाहीत माहिला असल्यास गॅझेट पूरावा किंवा इतर पुरावा | | | |
| २२ | शासकिय सेवेत असल्यास त्याबाबतचे संस्थाप्रमुखाचे नाहरकत प्रमाणपत्र | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३ | यापुर्वीच्या शासकिय सेवेचा राजीनामा दिलेला असल्यास त्याबाबतचा पुरावा | | | |
| २४ | अभिप्राय | | | |

टिप- अ.क्र.१ते १० (३ वगळुन) मध्ये नमुद प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर करणे आवश्यक असतील.
प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केली नाहीत तर समुदपदेशनाची परवानगी देण्यात येणार नाही.

अ) सर्व आवश्यक कागदपत्रांची / प्रमाणपत्रांची पुर्तताकरीत आहेत.

ब) खालील कागद पत्रांची पुर्तता करीत नाहीत.

१)

२)

३)

# परिशिष्ट "क"

## उमेदवारांना नियुक्तीबाबत सुचना

१) पदस्थापना व नियुक्ती आदेश देण्याकरिता समुपदेशन प्रक्रिया सकाळी ठिक ९.३० वाजता सुरु होईल सर्व उमेदवारांनी समुपदेशनाचे ठिकाण स्थापित केलेल्या नोंदणी कक्षात सकाळी ९.०० वाजता उपस्थितीत राहणे आवश्यक आहे.

२) जे उमेदवार सकाळी ९.३० नंतर हजर होतीलत्यांची नोंदणी सर्वात शेवटी करण्यात येईल व वेळेत हजर झालेल्या व नोंदणी केलेल्या उमेदवारांचे समुपदेशन पुर्ण झाल्यावरच समुपदेशनासाठी बोलविण्यात येईल.

३) समुपदेशनाच्या दिवशी जे उमेदवार पुर्व परवानगी न घेता अनुपस्थितीत राहतील त्यांच्या नियुक्ती करीता विचार करण्यात येणार नाही.

४) नोंदणी प्रक्रिया पुर्ण झाल्यावर सर्व उपस्थित उमेदवारांच्या मुळ प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात येईल. याकरिता सर्व मुळ प्रमाणपत्रे व त्याची एक सांक्षांकित प्रत तयार ठेवावी. सदर तपासणीत सकाळी ९.३० पासुन सुरु करण्यात येईल.

५) मुळ प्रमाणपत्र नसल्यास किंवा अपुरी प्रमाणपत्रे असल्यास अशा उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची तपासणी केली जाणार नाही. अशा उमेदवारांना कोणतीही मुदत देण्यात येणार नाही.

६) प्रमाणपत्रांची तपासणी पुर्ण झाल्यावर सर्व उपस्थित उमदेवारांना सभागृहामध्ये समुदपदेशन व नियुक्ती प्रक्रियेची माहिती देण्यात येईल. उमेदवारांनी सदर प्रक्रिया काळजीपुर्वक समजावुन घ्यावी व काही शंका असल्यास त्याचे निरसन तेथेच करुन घ्यावे.

७) निवडीसाठी पात्र उमदेवारांची संवर्गनिहाय अंतर्गम जेष्ठतासुचीनुसार समुपदेशनासाठी बोलावण्यात येईल.

८) समुपदेशनास जाण्यापुर्वी उमदेवाराने सभागृहात व सुचना फलकावर त्यांच्या संवर्गातील रिक्त पदांची माहिती काळजीपुर्वक पहावी व शिल्लक पदांमधुन त्यांच्या पसंतीची २ ते ३ ठिकाणे निवडावीत.

९) समुपदेशन समितीकडे परिशिष्ट अ मधील समुदपदेश नमुना सादर करावा व उमेदवाराने निवडलेल्या २ ते ३ ठिकाणांमधुन एक ठिकाण अंतिम करावे.

१०) उमेदवाराने नियुक्तीसाठी अंतिम ठिकाणी निश्चित केल्यावर त्याची नोंद सर्व रिक्त जागांच्या तक्त्यांमध्ये करण्यात येईल त्यामुळे रिक्त पदांमध्ये बदल होत राहील याची उमेदवारांनी नोंद घ्यावी व त्यानुसार पसंतीक्रमामध्ये सुधारण करावी.

११) उमेदवारांनी [illegible] नियुक्तीचे ठिकाण निश्चित केल्यावर त्याची नोंद समुपदेशन नमुन्यात घेण्यात येईल व त्यावर उमेदवार व समिती सदस्य स्वाक्षरी करतील. यानंतर उमेदवाराने निवडलेल्या ठिकाणामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल केला जाणार नाही.

१२) उमदेवाराने व समुपदेशन समितीने पदस्थापनेचे ठिकाण निश्चित केल्यानंतर उमेदवाराचे नियुक्ती आदेश तयार करण्यात येतील.

१३) उमेदवाराने सदर नियुक्ती आदेश तपासुन त्यात नमुद आपले नाव, प्रवर्ग, पदाचेनाव, पदस्थापनेचे ठिकाण इत्यादी तपशिल बरोबर आहे याची खात्री करुन घ्यावी व नियुक्ती आदेश मिळाल्याची पोहोच पावती द्यावी.

१४) उमेदवरास नियुक्ती प्रक्रियेबाबत काही आक्षेप असल्यास त्यांनी तात्काळ समुपदेशन समितीस सुचित करावे. सदर उमेदवाराचे समुपदेशन पुर्ण झाल्यानंतर कोणताही आक्षेप स्विकारला जाणार नाही.

१५) ज्या महिला उमेदवारांची प्रसुती नजीकच्या काळामध्ये झालेली आहे त्यांनी अधिकारीपत्र जवळच्या व्यक्तिला देवून समुपदेशनासाठी ओळखपत्रासहीत हजर राहणेस परवानगी देण्यात येत आहे.

१६) समुपदेशन करीता उमेदवारांशिवाय इतर कोणालाही आवारामध्ये प्रवेश देण्यात येणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी व वेळोवेळी देण्यात येणा-या सुचना तसेच कार्यालयीन शिस्तींचे पालन करावे.

*******************************